**आपल्या क्षेत्रातील एकूण रास्तभाव दुकानांची संख्या व तपशील हा आरसीएमएस (RCMS) मधील रास्तभाव दुकानांची संख्या व तपशीला सोबत दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंत जूळवून घेण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**

**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२११८/प्र.क्र.१२७/नापु-३१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ११ एप्रिल, २०१८

**शासन परिपत्रक :-**

राज्यात RCMS (Ration Card Management System) प्रणालीद्वारे रास्तभाव दुकानांचे व्यवस्थापन करण्यात येते. त्यामुळे शासनाने RCMS मधील FPS डाटाबेस हा प्रमाण डाटाबेस म्हणून स्विकारला आहे. त्यामुळे RCMS मधील दुकानांची संख्या शासनाद्वारे अंतिम मानण्यात येत आहे.

२. शासनाने ही बाब अंतिम करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०१८ हा दिनांक निर्धारित केला आहे. या मुदतीत आपल्या क्षेत्रातील एकूण रास्तभाव दुकानांची संख्या (FPS) व तपशील हा RCMS मधील रास्तभाव दुकानांची संख्या त्याच्या तपशिलाशी जूळवून घ्यावा. तसेच, दिनांक २ मे, २०१८ रोजी RCMS मधील रास्तभाव दुकानांची संख्या अंतिम करण्यात आली असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे. शासनाकडून दिनांक २ मे, २०१८ पासून RCMS मधील रास्तभाव दुकानांची माहिती प्रमाण माहिती समजली जाईल.

३. यापुढे नवीन रास्तभाव दुकाने व त्याचा तपशील RCMS प्रणालीमध्ये निर्माण केल्याशिवाय रास्तभाव दुकानांना परवाना देण्यात येऊ नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४१२११५८०९२००६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sneha Ramesh Borge

Digitally signed by Sneha Ramesh Borge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=988901809dfcd510940c674bb051fe0eb2ac523eb262d1e366cf72319965e109, cn=Sneha Ramesh Borge
Date: 2018.04.12 12:00:14 +05'30'

**(स्नेहा र. बोरगे)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
२) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी
५) मा.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६) निवडनस्ती/ नापु-३१